टिळक महाराष्ट्र युनिव्हर्सिटी इन्स्टिटयूट ऑफ नर्सिंग एज्युकेशन ॲन्ड रिसर्च, पुणे या संस्थेस बी.एस्सी. (नर्सिंग) महाविद्यालय सुरु करण्यास मान्यता देण्याबाबत...

# महाराष्ट्र शासन
## वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
### शासन निर्णय क्र.एनयुआर-१३०८/प्र.क्र.४२२/०८/शिक्षण-१
### मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांकः ६ मे, २०११

वाचाः- १) शासनाचे समक्रमांकाचे दि.८.४.२००९ चे आवश्यकता प्रमाणपत्र

२) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.फाईल नं.०२/ऑगष्ट /२००८-आयएनसी, दि.९.८.२००८ व प्रमाणपत्र नं.१८-१९/४६०८-आयएनसी, दि.२७.८.२००८

३) अध्यक्ष, टिळक महाराष्ट्र युनिव्हर्सिटी, पुणे यांचे दि.१७.७.२०१० चे पत्र

**प्रस्तावनाः-**

शासनाकडून संदर्भ क्र.१ च्या पत्रान्वये टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे या संस्थेस इन्स्टिटयूट ऑफ नर्सिंग एज्युकेशन ॲन्ड रिसर्च, पुणे येथे बी.एस्सी.(नर्सिंग) महाविद्यालय सुरु करण्यासाठी आवश्यकता प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले होते. सदर आवश्यकता प्रमाणपत्राची मुदत ३ वर्ष एवढी आहे.

भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांनी संदर्भ क्र. (२) अन्वये सदर अभिमत विद्यापीठास इन्स्टिटयूट ऑफ नर्सिंग एज्युकेशन ॲन्ड रिसर्च, पुणे येथे सन २००८-०९ या शैक्षणिक वर्षासाठी ३० (तीस) विद्यार्थी प्रवेश क्षमतेचा बी.एस्सी.(नर्सिंग) महाविद्यालय सुरु करण्यासाठी परवानगी दिलेली आहे. सदर परवानगीच्या अनुषंगाने सदर संस्थेस बी.एस्सी.(नर्सिंग) सुरु करण्यास निर्ययाद्वारे मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः-**

भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांनी संदर्भ क्र.२ च्या दि.९.८.२०००८ च्या पत्रान्वये टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे या संस्थेस इन्स्टिटयूट ऑफ नर्सिंग एज्युकेशन ॲन्ड रिसर्च, पुणे येथे सन २००८-०९ या शैक्षणिक वर्षासाठी व पुढील तपासणी होईपर्यंत ३० (तीस) विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे बीएसस्सी.(नर्सिंग) महाविद्यालय सुरु करण्यास दिलेली परवानगी विचारात घेवून संस्थेस ३० (तीस) विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे बी.एस्सी. (नर्सिंग) महाविद्यालय सुरु करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधिनतेने शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती**

१) सदर अभ्यासक्रमाचे प्रवेश राज्य शासन/केंद्रशासन/मा.सर्वोच्च न्यायालय अथवा मा.उच्च न्यायालयांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर प्रवेशाकरीता कार्यपध्दती अवलंबण्यात यावी.

२) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व राज्य शासन यांनी बी.एस्सी. (नर्सिंग) अभ्यासक्रमासाठी केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील.

३) संस्थेने त्यांच्या संस्थेत शासकीय वैद्यकीय/परिचर्या महाविद्यालयातील शिक्षकांस नियत वयोमान सेवा निवृत्ती अथवा स्वेच्छानिवृत्त असल्याखेरीज कोणत्याही परिस्थितीत नोकरीत ठेवणार नाही, याबाबतचे रु.१००/- स्टॅम्प पेपरवरील नोटराईज्ड प्रतिज्ञापत्र शासनास सादर करणे आवश्यक राहील.

४) महाराष्ट्र इन्स्टिटयुट प्रोव्हिबिशन ऑफ कॅपिटेशन फी ॲक्ट, १९९७ (महाराष्ट्र ॲक्ट १९८८) मधील तरतुदींचे संस्थेने कोटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.

५) शासकीय नियम/कायदा मा.सर्वोच्च व मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्यायानुसार शैक्षणिक शुल्कासाठी जी कार्यपध्दती अनुसरणे वेळोवेळी भाग असेल, त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.

६) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी बीएसस्सी (नर्सिंग) अभ्यासक्रमासाठी विहित केलेल्या प्रमाणकांची योग्यरित्या पूर्तता करुन संस्थेने दरवर्षी परिषदेची मान्यता मिळविणे आवश्यक आहे.

७) संस्था आवर्ती/अनावर्ती स्वरुपाच्या खर्चासाठी शासनाकडे अनुदानाची मागणी करणार नाही असे लेखी अभिवचन संस्थेने शासनास दिले पाहिजे.

८) संस्थेने बीएसस्सी (नर्सिंग) महाविद्यालयास महाराष्ट्र परिचर्या परिषद, मुंबई यांनी प्रवेश करण्यास मान्यता दिल्यानंतरच विद्यार्थी प्रवेशित करावेत.

९) संस्थेन कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त जास्त विद्यार्थी प्रवेश करण्यात येऊ नयेत.

१०) संस्थेने गुणवत्तेवर आधारीत प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्या प्रवेश नियंत्रण समिती, मुंबई यांचेकडून मंजूरी घेणे व या अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणा-या फी शुल्काची निश्चिती शिक्षण शुल्क समितीकडून करुन घेणे संस्थेवर बंधनकारक राहील.

सदर आदेश भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेनुसार, निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(प्रकाश इंदलकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:-
मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
सचिव, भारतीय परिचर्या परिषद, कोटला रोड, नवी दिल्ली- ११०००२.
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
कार्यालयीन सचिव, प्रवेश नियंत्रण समिती, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९ खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१
कार्यालयीन सचिव, शिक्षण शुल्क समिती, शासकीय तंत्र निकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जगं मार्ग, वांद्रे (पूर्व) मुंबई-५१
प्रबंधक, महाराष्ट्र परिचर्या परिषद, इएसआयसी रुग्णालय आवार, लाल बहादूर शास्त्री मार्ग, मुलूंड, मुंबई-४०० ०८०
अध्यक्ष, असोशिएशन ऑफ मॅनेजमेंट ऑफ अनएडेड प्राव्हेट मेडिकल ॲंड डेंटल कॉलेजेस महाराष्ट्र, पोटमाळा, श्रीजी हाऊस, ७५, मिंट रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१
अध्यक्ष, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, विद्यापीठ भवन, पुणे-४११ ०३७
मा.मंत्री (वै.शि.), मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (वै.शि.), मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
निवडनस्ती (शिक्षण-१)